महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

मंगळवार ■ ०२ डिसेंबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक : १५७ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

## लक्षवेधी

## पालघर जिल्हा मतदानासाठी सज्ज

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पालघर, ता. १ (बातमीदार):** जिल्ह्यातील तीन नगर परिषदांसह एका नगर पंचायतीच्या सदस्यपदासाठी आणि थेट अध्यक्षपदाच्या निवडणुकांसाठी आज (ता. २) मतदान होणार आहे. या निवडणुकीत एकूण एक लाख १६ हजार ६६० मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. जिल्ह्यातील एकूण १२५ केंद्रांवर मतदान होणार आहे. या मतदान केंद्रांवर मतदान पथक आज (ता. १) रवाना झाली आहे. भाजप व शिवसेना शिंदे गटामध्ये युती न झाल्यामुळे या दोन्हीही पक्षांनी प्रचारासाठी आपले शक्तिप्रदर्शन मोठ्या प्रमाणात केले आहे. प्रचारासाठी एकंदरीत मतदार कमी, पण परिसरातील इतर गावातील किंवा शहरातील प्रचारासाठी खास निमंत्रित करून जनशक्तीचे प्रदर्शन करून दाखविले. आजपर्यंत प्रचाराची रणधुमाळी सुरूच आहे. एकंदरीत किरकोळ प्रकार वगळता कुठेही मोठ्या प्रकारचा अनुचित प्रकार घडला नाही. एकंदरीत शांततेत प्रचार सुरू होता. मतदान शंभर टक्के व्हावे, यासाठी प्रशासनानेही मोठी आघाडी घेतली होती, मात्र किती यश येते, हे मतदानानंतरच समजणार आहे.

## निवडणूक लांबल्याने वाड्यात शांतता

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वाडा, ता. १ (बातमीदार) :** नगर पंचायतीच्या प्रभाग क्रमांक १२ मध्ये उद्या (ता. २) डिसेंबरला होणारी निवडणूक न्यायालयाने स्थगित केली आहे. त्यामुळे शहरातील या प्रभागात सोमवारी (ता. १) प्रचाराच्या आघाडीवर सामसूम होती. गेले अनेक दिवस प्रचारात रात्रीचा दिवस करणाऱ्या उमेदवार व त्यांच्या कार्यकर्त्यांनीही ही घोषणा झाल्यानंतर आज विश्रांती घेणेच पसंत केले. दररोज रिक्षाद्वारे होणाऱ्या प्रचाराला वैतागलेल्या वाडावासीयांनीही शांतता अनुभवली. या प्रभागात मात्र अध्यक्षपदाचे मतदान होणार आहे. गेले आठ दिवस वाडा शहरात रॅली, पदयात्रा, घरोघरी जाऊन प्रचार, कॉर्नर सभा, आरोप-प्रत्यारोप, समाजमाध्यमांद्वारे होणारा प्रचार या माध्यमातून निवडणुकीचे वातावरण चांगलेच तापले होते. अगदी उद्यावर मतदान आलेले असताना अचानक रविवारी (ता. १) भिवंडी न्यायालयाने एका प्रभागाची निवडणूक पुढे ढकलण्याचा निर्णय घेतल्याने उत्साही उमेदवार हिरमुसले होते, मात्र प्रचाराला अवधी कमी आहे, अशी तक्रार करणाऱ्या या प्रभागातील कार्यकर्त्यांना आता अधिक कालावधी मिळाला आहे. आता पुन्हा कार्यकर्ते व हितचिंतकांना सांभाळावे लागणार असल्याने उमेदवार चिंतेत आहेत. या प्रभागात निवडणुकीचा पुढील कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर पुढील रणनीती आखण्याचा निर्णय उमेदवारांनी घेतला आहे.

## वालधुनीत उबर चालकाला लुटले

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याणमध्ये वालधुनी भागात एका उबर मोटार चालकाला वाहनातील प्रवाशानेच चाकुचा धाक दाखवून लुटल्याची घटना शुक्रवारी रात्री घडली. या प्रवाशाने सुरूवातीला आपणास बांद्रा येथे जायाचे आहे असे मोबाईलमधील उबरच्या उपयोजनवर नोंदणी केली. त्यानंतर या प्रवाशाला कल्याण पश्चिमेत मोटारीत घेतल्यानंतर त्याने आपला एक मित्र वालधुनी येथे आहे त्यालाही आपणास घ्यायचे आहे असे सांगून वालधुनी येथे मोटार नेण्यास सांगितली. त्या भागात उबर चालकाला चाकुचा धाक दाखवून लुटले. रक्कम न दिल्यास जीवे ठार मारण्याची धमकी दिली.

## ट्रकखाली चिरडून श्वानाचा मृत्यू

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** घोडबंदर येथील हिरानंदानी इस्टेट भागात रस्त्यात बसलेल्या एका भटक्या श्वानाच्या शरीवरून ट्रक गेल्याने त्याचा मृत्यू झाला. या घटनेप्रकरणी ट्रक चालकाविरोधात गुन्हा दाखल झाला आहे.

हिरानंदानी इस्टेट भागात २९ नोव्हेंबरला भटके श्वान रस्त्यावर बसले होते. त्याचवेळी ट्रक त्या श्वानाच्या शरीरावरून गेले. या घटनेत श्वानाचा मृत्यू झाला. श्वान प्रेमी महिलेला परिसरातून मोटारीने जात असताना तिला अपघाताची माहिती मिळाली. त्यानंतर तिने याप्रकरणी कासारवडवली पोलीस ठाण्यात महिलेच्या तक्रारीनंतर प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम, १९६० चे कलम ११ (१) (अ) आणि भारतीय न्याय संहिता (बीएनएस) २०२३ चे कलम ३२५ प्रमाणे गुन्हा दाखल झाला आहे.

# आज कुळगाव बदलापूर नगरपरिषदेसाठी मतदान

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूर (ठाणे) :** कुळगाव-बदलापूर नगर परिषदेची निवडणूक आज पार पडणार आहे. कुळगाव-बदलापूर नगर परिषदेतही मोठा ट्वीस्ट समोर आला आहे. मतदानाच्या दोन दिवस आधीच ठाकरे गटाच्या निवडणूक चिन्हावर लढणाऱ्या सात जणांनी नगराध्यक्षपदी थेट भाजपला पाठिंबा दिल्याने राजकीय उलटफेर झाला आहे. स्थानिक ठाकरे गटही आक्रमक झाला असून भाजपला पाठिंबा देणाऱ्या उमेदवाराचा प्रचार करणार नसल्याचे स्पष्ट केले. राज्यातील जवळपास २३५ हून अधिक नगर परिषद, नगर पंचायतींसाठी मंगळवारी, २ डिसेंबर रोजी मतदान पार पडणार आहे. रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा पहिला टप्पा मंगळवारी पार पडणार आहे. मात्र, दुसरीकडे शनिवारी-रविवारी मोठ्या घडामोडी घडल्याने काही नगर परिषदांच्या निवडणुका आता २० डिसेंबर रोजी पार पडणार आहे. अंबरनाथ नगर परिषदेची निवडणूकही २० डिसेंबर रोजी पार पडणार आहे. अंबरनाथ नगरपरिषद निवडणुका २ डिसेंबरला होणार होत्या; मात्र संबंधित वादावर दाखल झालेल्या अपीलामुळे निवडणूक आयोगाने निवडणूक प्रक्रियेत बदल करत मतदानाची तारीख तब्बल १८ दिवसांनी पुढे ढकलली आहे. आता अंबरनाथमध्ये मतदान २० डिसेंबर रोजी होणार आहे. तर, निकाल २१ डिसेंबर रोजी जाहीर होणार आहे.



## सहा प्रभागात 20 डिसेंबर रोजी होणार मतदान !

**■ मतमोजणी २१ डिसेंबर रोजीच!**

कुळगाव-बदलापूरमधील ६ प्रभागातील निवडणूक पुढे ढकलण्यात आली आहे. प्रभाग क्रमांक १५ ब, १७ अ, १० ब, ८ अ, ५ ब, १९ अ या प्रभागांचा समावेश आहे. या जागांवर २० डिसेंबर रोजी मतदान होणार आहे. तर, उर्वरित जागांवर उद्याच २ डिसेंबर रोजी मतदान पार पडणार आहे. मात्र, मतमोजणी ही एकत्रिच होणार आहे. कुळगाव-बदलापूर नगर परिषदेची मतमोजणी २१ डिसेंबर रोजीच होणार आहे.

## मतदानासाठी सार्वजनिक सुट्टी जाहीर

**राज्यातल्या नगरपरिषदा आणि नगरपंचायतींच्या निवडणुकीचा प्रचार काल रात्री १० वाजता संपला. आज विविध पक्षांच्या नेत्यांनी प्रचाराचा धडाका लावला होता. आजच्या मतदानासाठी यंत्रणा सज्ज आहे. त्यासाठी कर्मचारी आपापल्या मतदान केंद्रांवर पोहोचले आहेत. या निवडणुकीचं मतदान आज, तर मतमोजणी ३ डिसेंबर रोजी होणार आहे. यानुसार मतदानासाठी आज, २ डिसेंबर रोजी संबंधित ठिकाणी सार्वजनिक सुट्टी जाहीर झाली आहे.**

यात ठाणे जिल्ह्यातील कुळगांव बदलापूर, अंबरनाथ, यासह अनेक ठिकाणांचा समावेश आहे. राज्यातील नगरपरिषदा व नगर पंचायतीच्या निवडणुकांच्या अनुषंगाने मंगळवार दिनांक २ डिसेंबर, २०२५ रोजी खालील अनुसूचीत दर्शविलेल्या संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मतदार संघात सार्वजनिक सुट्टी जाहीर करीत आहे. हा सुट्टीचा नियम मतदार क्षेत्राबाहेर कामाची जागा असलेल्या कर्मचाऱ्यांसाठीही लागू असेल, म्हणजेच मतदार म्हणून नाव असलेल्या सर्व कर्मचाऱ्यांना ही सुट्टी मिळणार आहे. बुधवारी जारी करण्यात आलेल्या शासकीय निर्णयानुसार ज्या जिल्ह्यांमध्ये मंगळवारी मतदान होणार आहे, त्या जिल्ह्यांतील कर्मचारी, अधिकारी आणि कामगार यांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी ही पगारी सुट्टी मिळेल. मागील निवडणुकांमध्ये काही आस्थापनांनी पगारी सुट्टी किंवा कामातून वेळ दिला नाही. यामुळे अनेक लोकांना त्यांच्या मतदानाच्या हक्कापासून वंचित राहावे लागले. त्यामुळे, सर्व पात्र नागरिक आपला मतदानाचा हक्क बजावू शकतील याची खात्री करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

## ठाकरे सेनेच्या सहा उमेदवारांचा नगराध्यक्षपदाच्या उमेदवार रूचिता घोरपडे यांना पाठिंबा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूर :** भाजपविरूद्ध कठोर भूमिका घेणाऱ्या उद्धव ठाकरे आणि त्यांच्या शिवसेनेच्या नेत्यांच्या भूमिकेला केराची टोपली दाखवणारा धक्कादायक प्रकार ठाणे जिल्ह्यातील बदलापूर शहरात समोर आला आहे. कुळगाव बदलापूर नगर परिषदेच्या निवडणुकीसाठी मंगळवारी तयारी होत असताना येथील शिवसेनेच्या ६ पेक्षा अधिक उमेदवारांनी भाजपच्या थेट नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार रूचिता घोरपडे यांना पाठिंबा जाहीर केला आहे. भाजपने ९ उमेदवारांनी पाठिंबा दिल्याचे जाहीर केले आहे. तर आतापर्यंत ६ उमेदवारांनी पक्षादेशाची प्रतारणा केली असून त्यांना मतदान न करण्याचे आवाहन आम्ही पक्षाच्या वतीने करत असल्याची माहिती ठाकरेंच्या शिवसेनेचे शहरप्रमुख किशोर पाटील यांनी केले आहे. या भाजपच्या खेळीने राजकीय वर्तुळात खळबळ निर्माण झाली आहे.

शिवसेना पक्ष फुटीत भाजपचा थेट सहभाग होता हा आरोप करत २०२२ पासून ठाकरेंच्या शिवसेनेचे राजकारण भाजपावर प्रामुख्याने टीका करणे आणि त्यांच्या धोरणांचा समाचार घेणे यावर अवलंबून आहे. उद्धव ठाकरेंपासून संजय राऊतांपर्यंत सर्वच नेते भाजपवर दररोज तुटून पडत असतात. ठाणे जिल्ह्यात मात्र वेगळीच राजकीय परिस्थिती निर्माण झाली आहे. ठाणे जिल्ह्यातील अ वर्ग नगरपरिषद असलेल्या कुळगाव बदलापूर नगरपालिका निवडणुकीच्या मतदानासाठी अवघे काही तास शिल्लक असताना ठाकरेंच्या शिवसेनेत मोठी फुट पडली असून थेट उमेदवारांनीच कट्टर विरोधक असलेल्या भाजपच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवाराला उघड पाठिंबा जाहीर केला आहे. येथे शिंदेंच्या शिवसेनेविरूद्ध भाजप आणि अजित दादांच्या राष्ट्रवादी काँग्रेस युतीमध्ये थेट लढत होते आहे.

## भिवंडी : महसूल प्रशासनाकडून केवणी परिसरातील वाळू माफियांच्या बोटी भस्मसात



**भिवंडी जवळील केवणी, खारबाव, अंजुरदिवे भागात वाळू उपसा करणारे लोक मध्यरात्रीच्या सुमारास बेकायदा वाळू उपसा करत असल्याच्या तक्रारी वरिष्ठांकडे गेल्या होत्या. वरिष्ठांच्या निर्देशावरून केवणी हद्दीतील सक्शन पंप, तराफे ज्वलनशील घटकांच्या साहाय्याने जाळन टाकले. ही कारवाई नियमित सुरूच ठेवण्यात येणार आहे.**

**● अभिजीत खोले, तहसीलदार, भिवंडी.**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
प्रतिनिधी

**कल्याण :** उल्हास खाडी किनारच्या भिवंडी जवळील केवणी गाव हद्दीत मध्यरात्रीच्या सुमारास दहाहून अधिक सक्शन पंप, तराफे (बार्ज) अधिक प्रमाणात खाडीतून रेती उपसा करतात. रात्रीतून उपसा केलेली रेती विकासक, वाळू दलालांना चढ्या दराने विकतात. अशी वाढत्या तक्रार जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्राप्त झाल्या होत्या. या तक्रारीच्या अनुषंगाने शुक्रवारी मध्यरात्री भिवंडी, ठाणे महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांनी वरिष्ठांच्या आदेशाने संयुक्तपणे कारवाई करून रेती माफियांच्या सात बोटी ज्वलनशील घटकांनी जाळून टाकल्या.

चित्रपटातील थराराप्रमाणे रात्रीच महसूल अधिकाऱ्यांच्या बोटीने वाळू माफियांना पकडण्यासाठी त्यांचा पाठलाग केला. ते पळून जाण्यात यशस्वी झाले. महसूल अधिकार आणि पोलिसांनी रेती माफियांना बोटीसह पकडण्याची गुप्त व्यूरचना आखली होती. भिवंडीचे तहसीलदार अभिजीत खोले, ठाणे रेतीगटाचे तहसीलदार अमोल कदम, खनिकर्म अधिकारी विवेक घुले, भरारी आणि दक्षता पथकाचे अधिकारी रेती माफियांना कोणतीही चाहूल लागू नये अशा पध्दतीने शुक्रवारी रात्री केवणी खाडी किनारी पोहचले.

महसूल अधिकाऱ्यांनी केवणी गाव हद्दीतील खाडी पात्रात शासकीय बोट उतरवून रेती माफियांचा चित्रपटातील थराराप्रमाणे बोट चालवून पकडण्याचा प्रयत्न केला. आपल्या दिशेने महसूल अधिकारी, पोलीस येत आहेत याची जाणीव झाल्यावर रेती माफियांनी आपल्या सात सक्शन पंप, सोबतचे तराफे, बोटी सोडून खाडीत उडी मारून पळ काढला. जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, भिवंडी उपविभागीय अधिकारी अमित सानप यांच्या निर्देशावरून ही कारवाई करण्यात आली.



## कल्याण शहरात रॅलीद्वारे एचआयव्ही एड्स जनजागृती !

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

दि.०१ डिसेंबर २०२५ रोजी जागतिक एड्स दिनाचे औचित्य साधून कल्याण डोंबिवली महानगरपालिकेतील वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत या घातक रोगाला नियंत्रणात आणण्यासाठी, अडथळ्यांवर मात करू, एकजुटीने एचआयव्ही एड्सला लढा देऊ ,नवपरिवर्तन घडवू ही तीन उद्धिष्ट समोर ठेवून, कृष्णा कुमावत यांच्या नेतृत्वाखाली आयसीटीसी रुक्मिणीबाई रुग्णालय, कल्याण आणि अचिव्हर्स कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने एचआयव्ही/ एड्स जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड तसेच उपायुक्त प्रसाद बोरकर यांनी या रॅलीला हिरवा झेंडा दाखवून रॅलीचे उद्घाटन केले .

या उद्घाटन प्रसंगी प्र वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. प्रज्ञा टिके , रुक्मिणीबाई रुग्णालयाचे मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. पुरुषोत्तम टिके, एड्स विभागाच्या प्रमुख डॉ. सुलक्षणा त्रिभुवन, वसंत व्हॅली प्रसूतीगृहाच्या मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. सपना रामोळे, शहर क्षयरोग अधिकारी डॉ. पौर्णिमा ढाके, डॉ.महेश भिवंडीकर सर (अचिव्हर्स कॉलेजचे प्राचार्य) एआरटी विभागाचे प्रमुख डॉ.राजू लवंगारे व डॉ. अशोक भिडे उपस्थित होते.

## समायोजन किंवा 'स्वेच्छा मरण'

### कंत्राटी शिक्षकांनी दिला उपोषणाचा इशारा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** सरकारी सेवेत समायोजन करून कायम करावे, अन्यथा 'स्वेच्छा मरणाची' परवानगी द्यावी, अशी मागणी राज्यातील महाराष्ट्र राज्य समग्र शिक्षा योजनेतील कंत्राटी कर्मचाऱ्यांनी केली असून आपल्या मागणीकडे लक्ष वेधण्यासाठी नागपूर येथील हिवाळी अधिवेशनादरम्यान ८ डिसेंबर २०२५ पासून बेमुदत आमरण उपोषण करण्याचा इशारा कर्मचाऱ्यांनी दिला आहे. समग्र शिक्षा करार कर्मचारी संघर्ष समितीच्या वतीने हे आंदोलन करण्यात येणार आहे. मागील २० वर्षांपासून तुटपुंज्या मानधनावर आणि कंत्राटी पद्धतीने कार्यरत असलेल्या या कर्मचाऱ्यांनी समग्र शिक्षा योजनेतील सर्व कर्मचाऱ्यांना शासन सेवेत समायोजन करून कायम करावे. तसेच शासन सेवेत कायम न केल्यास 'स्वेच्छा मरणा'ची परवानगी द्यावी, अशी मागणी सरकारकडे केली आहे.

सरकारचे लक्ष वेधण्यासाठी आंदोलनादरम्यान कर्मचारी अन्नत्याग, शंखनाद, थाळीनाद, घंटानाद, टाळनाद, आक्रोश, भीकमागो, मूक आंदोलन आणि आत्मक्लेश आंदोलन करणार आहेत. आंदोलनाला सुरुवात झाल्यानंतर सहाव्या दिवशी कर्मचाऱ्यांच्या कुटुंबातील सदस्यही आंदोलनात सहभागी होतील, असा इशाराही समितीने दिला.








# "व्हिजिट माय पोलीस स्टेशन" उपक्रमातून विद्यार्थ्यांनी अनुभवले पोलीस स्टेशनचे कामकाज

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : पोलीस अधिकारी आणि पोलिसांबद्दल नागरिकांच्या मनामध्ये असणारी अनावश्यक भिती कमी करण्यासह समाजातील पोलिसांबद्दलचे नकारात्मक चित्र बदलण्याच्या उद्देशानेमहाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, ठाणे जिल्हा प्राधिकरण, ठाणे पोलीस आयुक्तालय, ग्लोबल केअर फाउंडेशन आणि नॅशनल सर्व्हिस स्कीम यांच्या संयुक्त विद्यमाने ठाणे शहरातील सर्व पोलिस ठाण्यांमध्ये पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांच्या संकल्पनेतून दि. 29 नोव्हेंबर 2025 रोजी सकाळी 10 ते दुपारी 4 या वेळेत"व्हिजिट माय पोलीस स्टेशन" उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. वरिष्ठ पोलीस निरिक्षक शिवाजी गवारे यांचे मार्गदर्शनाखाली वागळे इस्टेस्ट पोलीस येथे या उपक्रमाच्या माध्यमातून श्री विभूती



प्रकाशानंदजी विद्यालय, इंदिरानगर, ठाणे, परिसरातील शाळा, एन. एस. एस.चे विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष पोलीस स्टेशनला भेट देऊन पोलिसांचे कामकाज अनुभवले.

यावेळी पोलीस ठाण्याची माहिती, येथील कार्यपद्धती आणि इतर महत्वाची माहिती पोलीस निरिक्षक (गुन्हे ) प्रविण सावंत यांनी दिली गेली. स्टेशन हाऊस ऑफिस कार्यालय, ड्युटी ऑफिस / स्टेशन मास्तर डेस्क, गुन्हे तपास विभाग, कायदा व सुव्यवस्था / बीट मार्शल युनिट, महिला सहायता कक्ष, बाल सहायता व संरक्षण कक्ष, हरवलेले ' सापडलेले ( मुद्देमाल कक्ष ) पासपोर्ट / पडताळणी डेस्क, वाहतूक डेस्क, समुदाय पोलिसिंग डेक्स, रेकॉर्ड व दस्ताऐवजीकरण विभाग, सीसीटीव्ही मॉनिटरिंग रूम, सायबर गुन्हेगारी, ऑनलाईन फसवणुक, ब्लेकमेलींग सह

**पोलीस प्रशासन आणि सर्वसामान्य नागरिकांमधील संवाद अधिक दृढ करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. नागरिकांच्या तक्रारी -अडचणी यावर तात्काळ तोडगा काढण्याचा प्रयत्न, पोलिसांच्या दैनंदिन कामकाजाची माहिती देणे, तसेच नागरिकांना आवश्यक कायद्यांची जागरूकता निर्माण करणे हे या कार्यक्रमाचे प्रमुख घटक आहे.**
**- शिवाजी गवारे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक**
**वागळे इस्टेट पोलीस स्टेशन, ठाणे**

सायबर जागृतता माहिती,सोशल मीडियाच्या तक्रारीसाठीचा नंबर, ठाणे जिल्हा आपत्कालीन हेल्पलाईन माहिती, पोलिसांच्या वतीने वापरली जाणारी हेल्पलाईन नंबर ची माहिती पोलीस उपनिरिक्षक महेश चव्हाण यांनी दिली. मोफत विधी सेवा, मदतीचे प्रकार यांची माहिती ठाकूर रामनारायन कॉलेज ऑफ लॉ दहिसर या लॉ कॉलेजचे विद्यार्थी दिपीका मिश्रा, अंजनी झा, साक्षी उपाध्याय, विपूल सिंह, नाझीम खान यांनी दिली. तर एम.एम.एस.ए. एफ. कार्बाइन मशिन गन,12 बोर, एके 14 सेवन, 7.62 एम. एम. एस. एल. आर. रायफल या हत्यारांची माहिती पोलीस उपनिरिक्षक सुदाम पिसे, रामहरी भवर, सहा. पोलीस उप निरीक्षक सुभेदार मुळीक, अभिजीत माने यांनी दिली. श्री विभूती प्रकाशानंदजी विद्यालयाचे मुख्याध्यापक राकेश तोमर यांनी पोलीस निरिक्षक (गुन्हे ) प्रविण सावंत यांना पुस्तक भेट देऊन दिलेल्या माहिती बद्दल व पोलीसांचे कार्याचे कौतुक करत आभार माणले.

# भिवंडीत उपविभागीय अधिकाऱ्यांनी केली धडक कारवाई

## सक्शन पंप व बार्ज जाळून पाण्यात बुडवले

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : राज्य शासनाने नदी व खाडी मध्ये रेतीचा उपसा करण्यास मनाई केली असताना भिवंडी तालुक्यात मोठ्या प्रमाणात खाडीत सक्शन पंप लाऊन बार्जव्दारे रेती उपसा (उत्खनन) सुरू असल्याची तक्रार भिवंडी उपविभागीय अधिकारी अमित सानप व तहसीलदार अभिजित खोले यांना मिळताच त्यांनी मध्यरात्री च्या सुमारास आपल्या विशेष पथकासह काल्हेर - केवणी बंदर येथे रेती उपसा करणाऱ्या 4 सक्शन पंप व 3 बार्ज धडक कारवाई करीत ते पेटवून (जाळून) पाण्यात बुडवून टाकले आहेत. तसेच मोठ्या प्रमाणात लाखो रुपये किमंतीचा रेतीसाठा जप्त करण्यात आला आहे.महसूल विभागाने केलेल्या या धडक कारवाई मुळे रेती उपसा करणाऱ्या माफीया मध्ये खळबळ उडाली आहे.या प्रकरणी रेती उपसा करणाऱ्या अज्ञात इसमां विरोधात पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



विशेष म्हणजे सदरचा प्रकार हा वनखात्याच्या जागेवर असल्याचे उघड झाले असुन वन विभाग अधिकाऱ्याचे या गंभीर प्रकाराकडे दुर्लक्ष असल्याची माहिती हळूच महसूल अधिकाऱ्यांनी दिली.

भिवंडी तालुक्यातील वेशीवरूण जाणाऱ्या नदी व खाडीतून मोठ्या प्रमाणात रेती उत्खनन होत आहे त्यामुळे पर्यावरणाचे संतुलन बिघडत असुन नुकसान होत आहे. याबाबत महसूल विभागाचे सर्कल अधिकारी व तलाठी यांच्याकडे ग्रामस्थांनी तक्रारी करून सुद्धा त्यांनी दुर्लक्ष केल्यामुळे अखेर ग्रामस्थांनी उपविभागीय अधिकारी, तहसीलदार व ठाणे जिल्हाधिकाऱ्यांकडे याबाबत तक्रारी केल्या त्यामुळे गंभीर दखल घेत जिल्हाधिकारी पांचाळ यांनी दिलेल्या निर्देशानुसार उपविभागीय अधिकारी अमित सानप, तहसीलदार अभिजित खोले यांच्या विशेष पथकाचे अमोल कदम ठाणे रेतीगट तहसीलदार विवेक घुले,खनिकर्म अधिकारी, भरारी पथक, दक्षता पथक, वन अधिकारी व पोलीस पथकासह काल्हेर - केवणी ते खारबाव खाडी दरम्यान मध्यरात्री सुमारास शासकीय बोटीतून गस्त घालत असताना रेतीबंदर येथे बार्ज वर सक्शन पंप लाऊन खाडीपात्रात रेती उपसा करीत असल्याचे आढळून आले त्यामुळे सदर पथकाने नदी किनारी छापा कारवाई केली असता तेथे रेती उपसा करणाऱ्या अनोळखी इसमांनी तेथून पळ काढला यावेळी ४ संक्शन पंपचे वॉल काढुन खोल पाण्यात बुडविण्यात आले आणि ३ बार्ज पेटवुन (जाळून) पाण्यात बुडविण्यात आल्याची माहिती तहसीलदार खोले यांनी दिली.

केवणी बंदर येथील अनधिकृत रित्या उत्खनन करुन काढण्यात आलेली रेती साठवणुक करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या १६ कुंड्या जे.सी.बी. च्या सहाय्याने नष्ट करण्यात आल्याची माहिती उपविभागीय अधिकारी सानप यांनी दिली सकाळी ६.३० वा.पर्यंत ही कारवाई सुरू होती.याबाबत नारपोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असुन पोलीस शोध घेत आहेत.

# शेतकऱ्यांची रब्बी हंगाम पेरणी उशिराने

## सतत पडणाऱ्या पावसामुळे लागवड उशिराने

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर ग्रामीण( नरेंद्र पाटील)-** नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यापर्यंत पडलेल्या पावसामुळे शेतकऱ्यांची भाताची कापणी उशिरा झाल्याने व शेतामध्ये साचलेल्या पाण्यामुळे यावर्षी वासिंद व परिसरातील रब्बी हंगामाची पेरणी शेतकऱ्यांना उशिरा करावी लागत आहे.

दरवर्षी शेतकरी दिवाळीपूर्वी भात शेतीची कापणी करून लागलीच आठ दिवसानंतर रब्बी पिकांची पेरणी करीत असतो त्याचबरोबर भाजीपाला पिके ही मोठ्या प्रमाणात लावत असतो परंतु यावर्षी नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्या पर्यंत पावसाने धुमाकूळ घातल्यामुळे भात शेतीची कापणी उशिराने झाली आहे त्यामुळे शेतात ओलावा असल्यामुळे शेतकऱ्यांना रब्बी पिकाची लागवड उशिराने करावी लागत आहे शेतकरी तूर हरभरा तीळ, मुग, वाल यासारखी रब्बी पिकांची पेरणी करतो तर भेंडी, कारली, दुधी घोसाळी, मेथी, मुळा, वांगी,टोमॅटो, सिमला मिरची, शिरोळा यासारख्या अनेक प्रकारच्या भाजीपाल्याची लागवड करीत असतो परंतु सातत्याने पडणाऱ्या पावसामुळे व जमिनीत असलेल्या ओलाव्यामुळे शेतकऱ्यांना रब्बी पिकांची पेरणी व भाजीपाला लागवड उशिराने करावी लागत आहे

रब्बी हंगाम लागवडीसाठी व लागवड झालेल्या भाजीपाला, कडधान्य व इतर शेती उत्पादित कामांची लगबग सध्या जोरात सुरू असल्याचे चित्र दिसून येत आहे

गेल्या मे महिन्याच्या शेवटच्या काळापासून ते नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्या पर्यंत असे जवळजवळ पाच-सहा महिने सुरू असलेल्या पावसामुळे भातशेती व इतर शेत पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. त्यामुळे यंदा शेतकऱ्यांना या नुकसानीला सामोरे जावे लागले आहे. भात कापणी कामे उरकून भात झोडणी कामं आटोपली जात आहेत. त्यातच काही शेतकऱ्यांनी रब्बी हंगामातील शेतीची कामे हाती घेतली आहेत. यामध्ये बहुतांश शेतकऱ्यांची विविध शेती उत्पादन लागवड झालेली असून काही शेतकऱ्यांची अंतिम टप्प्यात आहेत.

भाजीपाला, कडधान्य व इतर शेती उत्पादन कामं जोरदार सुरू झालेली आहेत. जिल्ह्यातील शेतकरी काबाडकष्ट करून शेती उत्पादित कामं करीत आहे. एकीकडे महागाईची झळ तर दुसरीकडे नैसर्गिक बदलाव परिस्थिती अशा विविध संकटांना शेतकरी वर्ग तोंड देत आहे. भातशेती, भाजीपाला, कडधान्य व इतर उत्पादित केलेल्या मालाला योग्य भाव मिळेल की, नाही याचीही शाश्वती नाही त्यामुळे शेतकरी राजा पूर्णपणे भरडला जात आहे. नुकत्याच या पावसावर अवलंबित खरीप हंगाम लागवडीची कामं उरकून या रब्बी हंगामातील शेतीच्या कामांध्ये शेतकरी वर्ग व्यस्त झालेला आहे. शेतीच्या कामांध्ये शेतकऱ्यांची लगबग सुरू असल्याचे दिसून येत आहे.

दरम्यान, यंदा सातत्य पावसामुळे जमिनीची मशागत करण्यासाठी उशीर झाला आहे. मिरची, काकडी व इतर भाजीपाला लागवडीवर परिणाम होऊन सध्या लागवडीची कामं सुरू असून 50/60 टक्क्यांपर्यंत लागवड झालेली असल्याचे साने येथील शेतकरी भास्कर पाटील व शेई येथील शेतकरी दीपक तारमळे यांनी सांगितले तर या वर्षी नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यापर्यंत पाऊस राहिल्याने जमिनीमध्ये रब्बी हंगामात आवश्यक असणारा ओलावा उपलब्ध असल्याने हा रब्बी पिकांसाठी फायदेशीर असल्याचे प्रगतशील शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

# विक्रम विदे यांच्या प्रामाणिकपणाला नागरिकांचा सलाम

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर ग्रामीण** : वासिंद येथील खातीवली–वासिंद सेवा सहकारी सोसायटी परिसरात एक महिला आपली पर्स विसरलेली होती त्यावेळी मिळालेली पर्स व त्यामधील असलेले दागिने याबाबत आपला प्रामाणिक पणा दाखवून पर्स व दागिने त्या महिलेला परत केल्याने या प्रामाणिकपणाचं अनेकांकडून कौतुक व प्रामाणिकतेला सलाम केला जात आहे .





शनिवार दि. 29 नोव्हेंबर रोजी सायंकाळी साडेसातच्या सुमारास वासिंद शहरातील खातिवली–वासिंद सेवा सहकारी सोसायटी परिसरात मुलीला सोडण्यासाठी आलेल्या उज्वला योगेश भोई यांची पर्स पडली होती. ती पडलेली पर्स येथील जीम मालक विक्रम विदे यांना सापडली सदरची पर्स उचलून तपासली असता त्यामध्ये मंगळसूत्र (दोरले) असल्याचे लक्षात आले.

विक्रम विदे यांनी सोशल मीडियावर माहिती देऊन शोध घेतला व चौकशी केली असता उज्वला भोई यांची पर्स व दागिने असल्याचे खात्री करून त्यांच्याकडे सुपूर्द केली असल्याची माहिती युवा कार्यकर्ते प्रशांत रोठे यांनी दिली तर विक्रम विदे यांनी दाखविलेल्या प्रमाणिकेतपणाचं कौतुक व त्यांच्या प्रामाणिक पणाला सलाम केला जात आहे.

**महाराष्ट्र शासन सांस्कृतिक कार्य विभाग आयोजित ६४ वी राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धा कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या आचार्य अत्रे रंगमंदिर या केंद्रावर सुरू असून या स्पर्धेत अत्यंत उत्कृष्ट आणि दर्जेदार नाटकांची मेजवानी नाट्यरसिकांना अनुभवायला मिळत आहे. या चढाओढीच्या स्पर्धेत दि.२९ नोव्हेंबर रोजी सादर झालेलं 'बाई शिवाय लग्न' या नाटकानं दर्जेदार विनोद आणि विषयाची खोली यांचं एक सुंदर गणित जुळवून आणलेलं आहे .**

# वेळेवर योग्य जोडीदार भेटला तर ठीक नाहीतर...

# बाई शिवाय लग्न



कोकण म्हटल की साधी विचारसरणी ,साधी माणसं, भाषा शैली ,तिथली वैविध्यतापूर्ण खादयसंस्कृती अशा असंख्य गोष्टी डोळीसमोर येतात. अशाच कोकणातील चाळीशीकडे झुकलेला ,मुंबईत चांगल्या नोकरीत कामाला असणारा 'रितेश' या मुख्य कलाकाराची भूमिका शैलेंद्र कोरकांती या नायकाने लीलया पार पाडली आहे. त्याचे लग्न ठरण्यासाठी किती संघर्ष करावा लागतो. हे या नाटकात दाखवले आहे. आजकाल मुला-मुलींची लग्ने जमणे जिकिरीचे बनले आहे. दिवस बदलले आहेत तशी परिस्थितीही बदलली आहे. लग्न जमवताना येणाऱ्या अडचणी व कारणे कालानुरूप वाढत जातायत. नाटकाच्या विषयाचे गांभीर्य राखत प्रेक्षकांना मनमुराद हसवले आहे. विषयाचे सादरीकरण अतिशय सुटसुटीत पद्धतीने केले आहे. कलाकारांच्या सहज वावरातून, लेखनातून त्यांची मेहनत नाटकाच्या सुरुवातीपासून शेवटापर्यंत प्रेक्षकांना दिसत राहते.नायकाचे मित्र प्रणित आणि संकेत यांचा भूमिकेला चोख न्याय देत एनर्जेटीक अभिनय होता. सोशल मिडियामुळे वाढलेली तुलना, करियरला महत्व देणारी पिढी, त्यामुळे वाढत चाललेला पालकांचा ताण, शिवाय समाजाच्या टीका, मुलींच्या वाढत्या अपेक्षा ; त्यासाठी नायकाचा चाललेला संघर्ष याव्यतिरिक्त वाढतं वय वेगळच अशा वास्तव दृष्टिकोनास केंद्रबिंदू ठेवून कथानक प्रेक्षकांपर्यंत पोहोचवण्यात लेखक -राहुल कदम व दिग्दर्शक -प्रसन्न कदम यांना पूर्ण यश आले आहे.

पूर्वी खूप साधे पणाने लग्न जमवली जायची. आणि आता जोडीदार शोधतात की अपेक्षांची यादी पूर्ण करणारा एखादा ? काही मुलींचा एक असा गोड गैरसमज असतो की भरपूर शिक्षण व नोकरी असली की झालं! , एकत्र कुटुंब नको, वेगळं राहायला आवडतं. अशा असंख्य अपेक्षा पूर्ण करत लग्न जुळून येण्यासाठी नायकाची कशी तारांबळ उडते शिवाय त्याला त्यासाठी वडिलांची , मित्रांची कशी मदत होते. हे बघण्यासारखे आहे.

कोकणातल्या ऐसपैस घरातील वातावरण व घरासमोरील अंगणातील तुळशी वृंदावन , तसेच सावधान वधू - वर सूचक मंडळ व तिथली स्थळ सुचवत समोरच्याला मनासारखं स्थळ मिळवून देताना विराज व त्याच्या बायकोबरोबरचा फोनवरील संवाद ह्यांची विनोदी भूमिका शिवाय त्यातील 'लग्नाळू आजोबा' प्रेक्षकांमध्ये हशा पिकवतात. ह्या सगळयात महत्त्वाचं म्हणजे नायकाला मिळालेला दोन मित्रांचा भावनिक आधार आणि घरात बायको नसताना घराची घेतलेली सगळी जबाबदारी पार पडणाऱ्या वडिलांचा मुलाप्रतीचा सजूतदारपणा, तसेच परिस्थितीची वास्तविक जाण असली तरी त्यांचा आशावादी दृष्टिकोन ही आवश्यक बाब गावाकडील अण्णांच्या पात्राला पूरक आहे .











**दोन अंकी नाटक**
**"बाई शिवाय लग्न"**
**पात्र परिचय**

- रितेश - शैलेंद्र कोरकांती
- वडील - प्रसन्न कदम
- प्रणित - कौस्तुभ कदम
- संकेत -अमोल पवार
- विराज - राहुल कदम
- राणे - रोहित कदम
- लग्नाळू आजोबा - अनिकेत यादव
- स्वप्नातील बायको - रुपाली रोकडे

**तंत्रज्ञ व सहाय्यकांची नावे**

- लेखक / नेपथ्य/ पार्श्वसांगित - राहुल कदम
- दिग्दर्शक - प्रसन्न कदम
- गीत / स्वर / संगीत - शिशिकांत कांबळी
- प्रकाश योजना - ऋषिकेश वायदंडे
- रंगभूषा - सोहम कोचरेकर
- वेशभूषा - अनिकेत यादव, गोपाळ चिलवेरी
- नृत्य दिग्दर्शक - स्फूर्ती मोरे
- संगीत संयोजन - रोहित कदम, रुपाली रोकडे

कथानकातील अण्णा प्रणितला बॅगेतून काही जिन्नस काढून दाखवतांना कोकणातील विशेष खाद्य संस्कृतीची ओळख दर्शवली आहे. शिवाय 'हे गावाकडील खाद्यपदार्थ मुंबईकरांपर्यंत पोहोचवणारे आपण पोस्टमास्टर झालोय 'अशा त्यांच्या बोलण्यातून मुंबईकर गावाला किती विसरत चाललाय हि सत्य परिस्थिती दाखवून देण्याचा प्रयत्न केला आहे. सादरीकरणादरम्यान कोकणातील संवादशैलीतील बारकावे, तसेच तिथली संस्कृती जपण्यास पुढच्या पिढीची कोकणाला असलेली गरज लेखकाने उत्तम दर्शवली आहे.

माझं लग्न कधी जमेल? असा प्रश्न पडलेल्या रितेशच्या स्वप्नात आलेल्या बायकोची भूमिका नायिका रूपाली रोकडे यांनी स्वप्न परीसारखी केली आहे. नाटकातील संगीत शिशिकांत कांबळी व नृत्य स्फूर्ती मोरे यांना सुंदर वातावरण निर्मिती करण्यास यश आले आहे. तसेच ऋषिकेश वायदंडे यांची प्रकाशयोजना प्रभावी वातावरण निर्मिती करण्यास उपयुक्त ठरली.

कोकणातील वातावरण दाखवताना त्यात अजून विशेषत्व दाखवता आले असते तर? प्रेक्षकांना अजून आवडले असते. मुलींच्या पालकांच्या मुलांकडून असलेल्या अवास्तव अपेक्षा त्याबद्दलची मुलांची मते समाजातील सध्याची वास्तविक स्थिती दाखवते.

एकंदरीत लग्न हा विषय आणि त्या भोवताली घोंगावणारे असंख्य अडथळे आणि त्याविषयी तरुण पिढीची घडत चाललेली मनस्थिती नाटकातून मांडली आहे.

सावित्री रंभा कला मंच संस्था बदलापूर तर्फे प्रकाशित केलेलं आणि नॅचरल परफॉर्मिंग आर्ट कल्याण तर्फे निर्मित केलेलं 'बाई शिवाय लग्न' या मनोरंजक दोन अंकी मालवणी (मराठी) उत्तरार्धात शेवटाला काय घडते हे पाहण्यास प्रेक्षकांनी हे नाटक जरूर पहावे.

दैनिक ठाणे
जीवनदीप वार्ता
https://www.facebook.com/jeevandeepnews/
https://www.instagram.com/thane_jeevandeep/
https://x.com/Jeevandeepvarta
https://jeevandeepvarta.com/

# भविष्यवेध



मंगळवार
०२ डिसेंबर २०२५

**मेष**
उत्साह द्विगुणित करतील. जर तुमची धन संबंधित काही गोष्ट कोर्ट-कचेरीत आटलेली असेल तर आज त्यात विजय मिळू शकतो आणि धन लाभ ही होऊ शकतो.

**वृषभ**
मुलांच्या यशस्वी होण्यामुळे तुम्हाला अभिमान वाटेल. लोक तुमच्या बाबतीत काय विचार करतात आज तुम्हाला या गोष्टीचा काही ही फरक पडणार नाही.

**मिथुन**
आज तुम्ही रिकाम्या वेळेत कुणासोबत भेट घेणे ही पसंत करणार नाही आणि एकांतात आनंदी राहाल. विनाकारण गोष्टींवर तुम्ही आपला किमती वेळ खराब करू नका.

**कर्क**
तंदुरुस्ती आणि वजन घटविण्याचे उपक्रम आपल्या शरीरास चांगला आकार देण्यासाठी उपयोगी ठरतील. कुणी गरजूला पैसा देऊन आनंदाचा अनुभव कराल.

**सिंह**
एखादा मोठा इव्हेंट आयोजित करू शकता. इतकी उर्जा आज तुमच्याकडे आहे. जे लोक तुमच्या प्रेमी पासून दूर राहतात त्यांना आज आपल्या प्रेमीची आठवण त्रास देऊ शकते.

**कन्या**
रात्रीच्या वेळी प्रेमी सोबत तासन तास फोनवर बोलू शकतात. अनपेक्षित स्रोतांकडून महत्त्वाची आमंत्रणे मिळतील. जोडीदाराच्या पुन्हा प्रेमात पडाल.

**तुळ**
वेळ कसा व्यतीत होतो या गोष्टीचा अनुभव कुणी जुन्या मित्रांसोबत भेट केल्यावर होऊ शकतो. अनपेक्षित स्रोतांकडून तुम्हाला महत्त्वाची आमंत्रणे मिळतील.

**वृश्चिक**
जोडीदाराच्या पुन्हा प्रेमात पडाल, कारण तो/ती यासाठी खरच लायक आहे. वेळ कसा व्यतीत होतो या गोष्टीचा अनुभव कुणी जुन्या मित्रांसोबत भेट केल्यावर होऊ शकतो.

**धनु**
तुमचा तणाव वाढेल आणि तुम्ही उदासही व्हाल. तुमच्या भाऊ-बहिणींपैकी आज कुणी तुमच्याकडून उधार मागू शकतात. तुम्ही त्यांना पैसे उधार घ्यालच.

**मकर**
तुमची आर्थिक स्थिती खराब होऊ शकते. तुमची प्रिय व्यक्ती आज तुमच्याकडे काही वेळ मागण्याची तसेच भेटवस्तूही मागण्याची शक्यता आहे.

**कुंभ**
अमर्याद सर्जनशीलता आणि उत्साह तुम्हाला अधिक फायदेशीर दिवसांकडे घेऊन जाईल. रात्रीच्या वेळी आज धन लाभ होण्याची पूर्ण शक्यता आहे .

**मिन**
तुमच्यातील लहान मूल जागे होईल आणि तुमची निष्पाप वागणूक यामुळे कुटुंबातील समस्या सोडविण्यात तुम्ही महत्त्वाची भूमिका बजावू शकाल.

## जीवनदीप महाविद्यालय गोवेलीच्या विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय बेंच प्रेस स्पर्धेत सुवर्ण कामगिरी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**गोवेली :** दिनांक २८ नोव्हेंबर ते दिनांक ३० नोव्हेंबर २०२५ रोजी ज्ञानेश्वर विद्यामंदिर किडवई मार्ग,मुंबई या ठिकाणी झालेल्या राज्य स्तरीय बेंच प्रेस स्पर्धेत १. कु.मोरेश कार्ले ७४ किलो वजनी गटात सुवर्णपदक
२. कु.प्रफुल पाटील १०५ किलो वजनी गटात कास्यपदक ३. कु. रितिका अवेरे



५७ किलो वजन गटात सुवर्णपदक ४. कु.गायत्री बडेकर ४७ किलो वजनी गटात सुवर्णपदक विजेत्या सर्व स्पर्धकांचे जीवनदीप संस्थेचे अध्यक्ष श्री.घोडविंदे सर त्याचप्रमाणे संचालक श्री.प्रशांत घोडविंदे,जीवनदीप महाविद्यालयाची प्रा.डॉ.अशोक वाघ सर यांनी अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## भिवंडीत शेतकऱ्यांसाठी एकदिवसीय प्रशिक्षण



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी :** तालुक्यात पाणी फाउंडेशन,राज्य सरकार आणि तालुका कृषी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने सत्यमेव जयते फॉर्मर कप २०२५-२६ अंतर्गत एकदिवसीय शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन चाविंद्रा येथील तालुका फळ-रोपवाटिका केंद्रात केले होते. गावनिहाय गटशेती करणारे शेतकरी, महिला शेतकरी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जीवनदीप महाविद्यालयात जागतिक एड्स दिनानिमित्त पथनाट्य व जनजागृती कार्यक्रम



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

सर्वसामान्य नागरिकांच्या मनात अनेक गैरसमज असलेला आजार अर्थात HIV एड्स; या आजाराला धरून लोकांच्या मनात खूप भीती पाहायला मिळते. ही भीती व गैरसमज दूर करण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्यासाठी सोमवार दिनांक. ०१/१२/२०२५ रोजी जीवनदीप महाविद्यालयात सक्रिय असलेल्या डी. एम. एल. टी. नर्सिंग या कौशल्य विकास कोर्सच्या विद्यार्थ्यांच्या मार्फत पथनाट्य व जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये आजारावर कशाप्रकारे उपचार करता येतात, तसेच होऊच नये म्हणून कोणती खबरदारी घ्यावी याबाबत पोस्टर व पथनाट्य यांच्यामार्फत मार्गदर्शन करण्यात आले. सदर कार्यक्रमाला जीवनदीप संस्थेचे अध्यक्ष. रविंद्र घोडविंदे, संचालक. प्रशांत घोडविंदे यांचे मार्गदर्शन लाभले. महाविद्यालयाचे प्राचार्य.डॉ. अशोक वाघ, उपप्राचार्य. हरेंद्र सोष्टे, डी. एम. एल.टी नर्सिंग चे शिक्षक वर्ग या कार्यक्रम प्रसंगी उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांच्या एकत्रित सहभागाने सदर कार्यक्रम उत्तम रीतीने पार पडला.

## भिवंडी-कल्याण-उल्हासनगर मार्गावर ई-बस सेवा सुरू होणार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी :** शहरातील नागरिकांच्या अनेक वर्षांच्या प्रतीक्षेनंतर भिवंडी महापालिकेच्या ई-बस सेवा प्रकल्पाला गती मिळाली आहे. लवकरच भिवंडी-कल्याण-उल्हासनगर मार्गावर ही सेवा सुरू होणार आहे. यासाठी सध्या शहरातील नागाव, टेमघर आणि कोंबडपाडा येथे चार्जिंग स्टेशनचे काम जोरात सुरू आहे.सध्या भिवंडी महापालिकेची स्वतःची बस सेवा नसल्याने नागरिक कल्याण-डोंबिवली आणि ठाणे महापालिकेवर अवलंबून आहेत. मात्र, त्या बसही शहरातील सर्व भागांत जात नाहीत. त्यामुळे वर्षानुवर्षे नागरिकांना रिक्षा भाडे, अव्यवस्थित खासगी वाहने आणि दैनंदिन प्रवासातील गैरसोयी यांचा सामना करून महागडा प्रवास करावा लागत होता. या समस्यांना पूर्णविराम देण्यासाठी भिवंडी-निजामपूर महापालिका पहिल्यांदाच नियोजित शहर बससेवा सुरू करत आहे. सरकारने भिवंडी शहरासाठी १०० इलेक्ट्रिक बस सुरू करण्यास मान्यता दिली आहे. शहराच्या विकासाच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.शहरासाठी १०० इलेक्ट्रिक बस सुरू करण्यास सरकारची मंजुरी मिळाली आहे. यापैकी ७५ बस नऊ मीटर आणि २५ बस १२ मीटर लांबीच्या असतील. महापालिकेच्या मते, बससेवेसाठी आवश्यक पायाभूत सुविधांपैकी ३५ टक्के काम पूर्ण झाले आहे. नागाव, टेमघर आणि कोंबडपाडा येथील तीन चार्जिंग स्टेशन पूर्ण झाल्यानंतर बस मार्गाची घोषणा करण्यात येणार आहे. सध्या चार्जिंग स्टेशन बांधण्याचे काम वेगाने सुरू आहे. हा प्रकल्प केंद्र आणि राज्य सरकारच्या विशेष निधीतून राबविला जात आहे. याशिवाय चार्जिंग स्टेशनसाठी स्वतंत्र १४.२७ कोटी रुपयांचा निधी मंजूर असून, त्यापैकी १४.२१ कोटी रुपये वितरीत झाले आहेत. त्यामध्ये केंद्र सरकारचे ६० टक्के म्हणजेच ११.२९ कोटी रुपये आणि राज्य सरकारचे ४० टक्के म्हणजेच ७.५३ कोटी रुपयांचे योगदान दिले आहे. या व्यतिरिक्त चार्जिंग स्टेशनसाठी १४.२७ कोटी रुपये स्वतंत्रपणे मंजूर करण्यात आले आहेत. त्यापैकी १४.२१ कोटी रुपये आधीच मंजूर करण्यात आले आहेत.

रुग्णालये, शाळा, बाजारपेठ आणि रोजगार क्षेत्रांपर्यंत परवडणारी, सुरक्षित आणि नियोजित बस सेवा उपलब्ध होत असल्याने हा प्रकल्प भिवंडीकरांसाठी मोठा बदल घडवणारा ठरेल. असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## खाडी व उड्डाणपूलाचा मार्ग वसईतील वाहतुककोंडी फोडणार !

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वसई, ता. १ (बातमीदार) :** वसई पूर्व आणि पश्चिम भागाला जोडणाऱ्या जुन्या उड्डाणपुलाचे काम सध्या सुरू असून, हा पूल थेट खाडीला जोडण्यात येणार आहे. यामुळे प्रवाशांचा प्रवास अधिक सुकर होणार असून, वसईतील वाहतूक कोंडीची मोठी समस्या दूर होण्यास मदत मिळेल. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पातील बदल आणि नव्या उपाययोजनांवर चर्चा करण्यासाठी रेल्वे, पालिका अधिकारी आणि लोकप्रतिनिधींनी नुकतीच पाहणी केली.

वसई पूर्व-पश्चिम जोडणाऱ्या जुन्या पुलाच्या बांधकामावेळी उतरण रस्त्याचा पर्याय आणि पूर्वी पेट्रोल पंपाजवळ असलेला उतरण रस्ता रद्द करण्यात आला आहे. यामुळे नवघर औद्योगिक वसाहतीमधील नागरिक, कामगार आणि कारखानदारांना वाहतूक अडथळे आणि गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. यावर तोडगा काढण्यासाठी माजी महापौर नारायण मानकर यांनी प्रशासनाकडे पत्रव्यवहार आणि चर्चा करून पश्चिम भागातून पूर्वेला जाण्यासाठी सिग्रलच्या अलीकडे मोठी जागा उपलब्ध आहे. या ठिकाणी पुलाची उतरण दिल्यास पश्चिम-पूर्व मार्गावरील वाहतूक सुरळीत होईल आणि कोंडी फुटेल, यावर गांभीर्याने विचार करण्याची मागणी केली आहे. वसई इंडस्ट्रीयल असोसिएशननेही यासंदर्भात प्रशासनाला पत्र दिले आहे.

उड्डाणपूल आणि वाहतुकीच्या समस्या तसेच उपाययोजनांची संयुक्तरित्या पाहणी करण्यासाठी रेल्वेचे अधिकारी मनीष पटेल आणि अभियंता देवराज बॅनर्जी, पालिका अधिकारी, माजी महापौर नारायण मानकर, विनायक निकम, प्रकाश रॉड्रिग्ज, वृन्देश पाटील, राजाराम बाबर, उदय चेंदवणकर, वसई इंडस्ट्री असोसिएशन, नवघरचे अध्यक्ष अनिल अंबर्डेकर, फ्रान्सिस फर्नांडिस आणि प्रशांत बागर उपस्थित होते.

## आवास योजनेवरून उल्हासनगरात सेना-भाजप संघर्ष ?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर, ता. १ (वार्ताहर)** उल्हासनगरमध्ये प्रधानमंत्री आवास योजनेवरून राजकीय रणधुमाळी शिगेला पोहोचली आहे. शिवसेना शिंदे गटाचे शहरप्रमुख राजेंद्रसिंह भुल्लर महाराज यांनी योजनेला विरोध करताना थेट न्यायालयात धाव घेतल्याने शहरातील राजकारणात मोठा भूकंप झाला आहे. राजेंद्रसिंह भुल्लर महाराज यांनी आपले न्यायालयीन लढ्याचे कारण स्पष्ट करताना थेट सत्ताधारी भाजपला आव्हान दिले आहे. त्यांनी म्हटले की, घरकुल व्हावं, पण कायदा मोडून नाही. विकास हवा, पण भ्रष्टाचाराच्या जोरावर नाही ! त्यांच्या म्हणण्यानुसार, हा विरोध राजकीय नसून, कायदा आणि सुव्यवस्थेसाठी आहे. त्यांनी प्रकल्पातील खालील गंभीर अनियमितता आणि भ्रष्टाचारावर बोट ठेवले.

उल्हासनगर भाजपने पक्ष कार्यालयात पत्रकार परिषद घेत शिवसेना शिंदे गटाचे शहरप्रमुख राजेंद्रसिंह भुल्लर महाराज यांनी योजनेला विरोध करत उच्च न्यायालयात रिट पिटिशन दाखल केल्याचा गंभीर आरोप केला. भाजप आमदार कुमार आयलानी, जिल्हाध्यक्ष राजेश वधारिया व माजी जिल्हाध्यक्ष प्रदीप रामचंदानी यांच्या मते, शिवसेना एका बाजूने योजनेचे श्रेय घेते, तर दुसरीकडे त्यांचाच वरिष्ठ नेता प्रकल्प न्यायालयात आव्हान देऊन रोखण्याचा प्रयत्न करतो, ही सरळसरळ नागरिकांची दिशाभूल आहे. राजेंद्रसिंह भुल्लर महाराज यांनी या आरोपांना सडेतोड उत्तर दिले. त्यांनी स्पष्ट केले की त्यांचा विरोध हा भाजप किंवा शिवसेना विरुद्ध नाही. काम पद्धतशीर आणि कायद्याने व्हावे यासाठीच त्यांनी न्यायालयाचे दरवाजे ठोठावले. ते म्हणाले की प्रकल्पासंदर्भातील कागदपत्रे, भूखंडाचा ताबा, आरक्षण स्थिती आणि डीपीआरची नोंद व्यवस्थित न करता निविदा काढण्यात आल्या आहेत. ज्यामुळे मोठ्या प्रमाणात अनियमितता झाली आहे.

## कल्याण डोंबिवली महानगरपालिका
### निवडणूक विभाग,मुख्यालय

### जाहिर आवाहन

**दिनांक : २९ नोव्हेंबर २०२५**

महाराष्ट्र शासन राजपत्र क्र. रानिआ-२०२५/प्र.क्र.२०/का-०७, दिनांक २१ ऑगस्ट, २०२५चे आदेशान्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ (१९४९ चा मुंबई अधिनियम क्र.५९) मधील कलम ७-अ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन दि. ०१ जुलै, २०२५ या दिवशी अस्तित्वात असलेल्या महाराष्ट्र विधानसभेच्या मतदार याद्या राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक/पोट निवडणूकांसाठी मतदार याद्या तयार करणेसाठी वापरण्यात येतील असे अधिसूचित करण्यात आले आहे.

तसेच राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचे रानिआ-२०२५/ग्रापनि/प्र.क्र.०३/का-८, दिनांक २९ ऑक्टोंबर २०२५ चे आदेशान्वये दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका भयमुक्त व पारदर्शक वातावरणात घेण्यासाठी मतदार यादी बिनचूक असणे आवश्यक आहे: या तत्वाचे पालन करण्याच्या दृष्टीने स्थानिक संस्थांच्या निवडणुकांसाठी वापरण्यात येणाऱ्या मतदार यादीत संभाव्य दुबार नावे आढळल्यास त्याबाबतीत अनुसरावयाची कार्यपध्दती स्पष्ट करण्यात आली आहे.

दिनांक ०१ जुलै, २०२५ रोजी अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या मतदार यादयांचा वापर करुन कल्याण डोंबिवली महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकांकरीता दिनांक २० नोव्हेंबर, २०२५ रोजी प्रभाग निहाय प्रारुप मतदार याद्या प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत. सदर प्रभागाच्या मतदार याद्यांमध्ये एकापेक्षा अधिक वेळा मतदारांची नांवे असल्याचे निदर्शनास आले आहे. अशा मतदारांची सविस्तर तपशिलासह यादी महानगरपालिकेच्या **www.kdmc.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येत असलेल्या संभाव्य दुबार मतदारांना आवाहन करण्यात येत आहे की, त्यांना कोणत्या **प्रभागात / EPIC क्रमांकावर** मतदान करावयाचे आहे. याची अचूक खात्री करुन घेण्यासाठी महापालिकेच्या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या **"परिशिष्ट-एक"** च्या नमुन्यात निवडणूक विभाग, महापालिका भवन, तिसरा मजला, शंकरराव चौक, कल्याण (प) या ठिकाणी लेखी अर्ज करावा. ज्या मतदारांची नांवे एकापेक्षा जास्तवेळा आली आहेत, अशा मतदारांनी स्वतःहुन पुढे येऊन महापालिकेची निवडणूक भयमुक्त व पारदर्शक वातावरणात पार पाडणेसाठी प्रशासनास सहकार्य करावे.

**सही /-**
**(अभिनव गोयल) भा.प्र.से.**
**आयुक्त**
**कल्याण डोंबिवली महानगरपालिका**

**जा. क्र. कडोंमपा/जसंवि/मुका/७३०**
**दिनांक : ०१/१२/२०२५**

## मतदारांचे नाव शोधण्यासाठी केडीएमसीच्या वतीने मदत कक्ष सुरु
### केडीएमसी आयुक्त अभिनव गोयल यांच्या उपस्थितीत शुभारंभ

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणूकांच्या अनुषंगाने मतदारांना मतदार यादीतील आपले नाव शोधणे सहज-सुलभ व्हावे यासाठी शासनाने http://mahasecvoterlist.in/ या संकेतस्थळावर सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने देखील महापालिकेच्या https://kdmc.gov.in/ या संकेतस्थळावर जाऊन मतदार यादीतील NAME WISE किंवा EPIC NUMBER WISE आपले नाव शोधण्याची सुविधा कल्याण डोंबिवलीतील नागरिकांना, मतदारांना उपलब्ध करुन दिली आहे.



तथापि महापालिकेच्या नागरिकांना, मतदारांना मतदार यादीतील आपले नाव शोधणे सोपे जावे याकरीता महापालिकेने महापालिकेच्या मुख्यालयातील नागरीक सुविधा केंद्रात मतदार मदत कक्ष सुरू केले असून या मदत कक्षाचा शुभारंभ महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांच्या उपस्थितीत आज करण्यात आला. मतदारांच्या सुविधेसाठी अशा प्रकारचा मदत कक्ष महापालिकेच्या सर्व प्रभागातील नागरीक सुविधा केंद्रात सुरु करण्यात येत असल्याची माहिती निवडणूक विभाग व माहिती तंत्रज्ञानाचे उपायुक्त समिर भूमकर यांनी दिली. यावेळी अतिरिक्त आयुक्त योगेश गोडसे, सिस्टम मॅनेजर प्रमोद कांबळे, निवडणूक विभागाचे अधीक्षक जयराम शिंदे व इतर अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## सौ. कमलताई किसन कथोरे महाविद्यालयाची मुरबाड येथे इंडस्ट्रीअल व्हिजिट



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

सोमवार दि. ०१ डिसेंबर, २०२५ रोजी वाणिज्य विभागामार्फत तृतीय वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक औद्योगिक भेटीचे शिवराज ड्रम अँड कंटेनर्स प्रायव्हेट लिमिटेड कंपनी मुरबाड येथे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांना विषयाचे थेअरी स्वरूपात माहिती तासिकमध्ये दिली जातेच परंतु त्यांना प्रॅक्टिकल स्वरूपात माहिती मिळावी हाच उद्देश ठेवून ही औद्योगिक भेट देण्यात आली. यावेळी शिवराज ड्रम अँड कंटेनर्स प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचे सर्वेसर्वा मा. श्री. उपेंद्र नाईक साहेब (Director), मा. सुवर्णा नाईक मॅडम (Vice - President), श्री. डी. एस. पाटील सर (Manager), श्री. एकनाथ हरड सर (Accountant), आणि श्री. विजय गावकर सर यांनी विद्यार्थ्यांशी हितगूज साधले. श्री. पाटील सर यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना उत्पादन प्रक्रिया, स्टोर विभाग माहिती, कच्चा माल ते अंतिम उत्पादन प्रक्रिया याबाबत सखोल अशी माहिती दिली. यावेळी महाविद्यालयातील तृतीय वर्ष वाणिज्य विभागाचे एकूण 20 विद्यार्थी तसेच प्रा. हर्षदा पवार मॅडम (वाणिज्य विभाग प्रमुख), प्रा. दिक्षा बोटकुंडले मॅडम आणि प्रा. विजय सोनार सर विद्यार्थ्यांसोबत उपस्थित होते. औ

द्योगिक भेटीचे यशस्वीपणे आयोजन करण्यासाठी जीवनदीप शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. रविंद्र घोडविंदे सर, संचालिका मा. सौ. स्मिता घोडविंदे मॅडम, संचालक मा. श्री. प्रशांत घोडविंदे सर , महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. योगेश माळी सर यांचे विशेष सहकार्य तथा मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांसाठी ही औद्योगिक भेट खूप फायदेशीर ठरली.

## एचआयव्ही/एड्स जनजागृतीसाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांची खर्डी ग्रामीण रुग्णालयाला भेट

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**खर्डी :** दिनांक ०१ डिसेंबर २०२५ रोजी जागतिक एड्स दिनानिमित्त कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय खर्डी, राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विभागाच्या विद्यार्थ्यांनी आज स्थानिक ग्रामीण रुग्णालयालय खर्डी येथे भेट देत सामाजिक बांधिलकीची जाण दाखवली.




या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी रुग्णालयातील डॉक्टर व आरोग्य कर्मचाऱ्यांशी संवाद साधत एचआयव्ही/एड्सविषयी माहिती जाणून घेतली. डॉ.नवनाथ कचरे यांनी रोगाची कारणे, प्रसाराचे मार्ग, प्रतिबंधक उपाय, तसेच उपचार उपलब्धतेबाबत मार्गदर्शनही मिळाले.

तसेच डॉ.मीनल बागुल यांनी सांगितले की,समाजात अजूनही एड्सबाबत गैरसमज मोठ्या प्रमाणावर आहेत. त्यामुळे युवकांनी योग्य माहिती समाजापर्यंत पोहोचवणे अत्यंत महत्त्वाचे आहे. NSS स्वयंसेवकांनी यासाठी सक्रिय भूमिका बजावावी, असे आवाहन त्यांनी केले.

या उपक्रमासाठी NSS चे स्वयंसेवक तसेच कार्यक्रम अधिकारी प्रा. राहुल सोनावणे आणि प्रा. रसिका सकपाळ उपस्थित होते. सदर उपक्रम हा संस्थेचे अध्यक्ष मा.श्री.रविंद्र घोडविंदे सर यांच्या प्रेरणेने आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.कैलास कळकटे सर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.

## लय भारी हास्य ग्रुपच्या दुसऱ्या शाखेचे उद्‌घाटन

### धकाधकीच्या जीवनात संगीतमय हास्य योगा हा सर्वात महत्त्वाचा उपाय – माजी आमदार नरेंद्र पवार



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण दि.1 डिसेंबर :** आजच्या ताणतणावपूर्ण आणि गतिमान जीवनशैलीत संगीताच्या तालावर केला जाणारा हास्य योगा हा मानसिक आणि शारीरिक आरोग्यासाठी अत्यंत उपयोगी उपाय असल्याचे प्रतिपादन माजी आमदार नरेंद्र पवार यांनी केले. कल्याणातील 'लय भारी हास्य ग्रुप'च्या दुसऱ्या शाखेचे उद्घाटन त्यांच्या प्रमुख उपस्थितीत नानासाहेब धर्माधिकारी उद्यानात करण्यात आले. या संस्थेचे संचालक दिलीप सूचक यांनी दक्षा सूचक या दांपत्याने या हास्य ग्रुपची सुरुवात केली आहे.

माजी आमदार नरेंद्र पवार यांनी सूचक दांपत्याला नानासाहेब धर्माधिकारी उद्यानात हास्य ग्रुपची दुसरी शाखा सुरू करण्याचे आवाहन केले होते. त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत सूचक दांपत्याने ही दुसरी शाखा सुरू केली आहे.

पहिली शाखा क्रांतिकारी वासुदेव बळवंत फडके मैदानात गेल्या वर्षी सुरू झाली असून सध्या त्यामध्ये 100 पेक्षा अधिक सदस्य सक्रिय आहेत. वाढत्या उत्साह आणि नागरिकांच्या सकारात्मक प्रतिसादामुळे दुसरी शाखा सुरु करण्यात आली आहे.

उद्घाटनाच्या पहिल्याच दिवशी 35 हून अधिक नागरिकांनी नोंदणी केली असून पुढील महिन्यात सदस्यसंख्या अडीचशेपर्यंत वाढेल असा विश्वास पवार यांनी व्यक्त केला. तर या नव्या हास्य ग्रुपच्या दुसऱ्या शाखेच्या उद्घाटनासह भाजपचे ज्येष्ठ पदाधिकारी तानाजी कर्पे यांचा वाढदिवसही यावेळी मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला.

या वेळी बोलताना पवार यांनी हास्य योगाचे आरोग्यावर होणारे विविध फायदेही अधोरेखित केले. मोठ्याने आणि मनापासून हसण्यामुळे शरीरात एंडॉर्फिन्स वाढतात आणि ताणतणाव दूर होतो, फुफ्फुसांची क्षमता वाढून श्वसनप्रक्रिया सुधारते, तर रक्तदाब नियंत्रणात राहतो. नियमित हास्य योगामुळे प्रतिकारशक्ती वाढून विविध आजारांपासून बचाव होतो. तसेच, हसताना शरीरातील स्नायू सक्रिय असल्याने सांध्यांची लवचिकता वाढते आणि शारीरिक कडकपणा कमी होतो. गटाने एकत्र हसण्यामुळे मानसिक आरोग्य सुधारते आणि समाजात सकारात्मकता तसेच एकोप्याची भावना दृढ होते, असेही त्यांनी सांगितले.

तर संगीतमय हास्य योगामुळे समाजात आनंदी, निरोगी आणि उत्साही वातावरण निर्माण होते, म्हणून अधिकाधिक नागरिकांनी या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहनही पवार यांनी केले.

यावेळी झालेल्या कार्यक्रमाला दिलीप सुचक, दक्षा सुचक, राजश्री नाईक, तानाजी कर्पे, किशोर चौधरी, स्मिता जगताप, दिनेश गावंडे, देवयानी गावंडे, राजेंद्र बडवे, अजब धोरणे, दिगंबर फडणीस, चिंतामणी वाघ आदी मान्यवर उपस्थित होते.



# कल्याण-डोंबिवलीतील प्रत्येक दिवा सौरऊर्जेवर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली:** डोंबिवली येथील पूर्वेकडील इंदिरा गांधी चौकात सोलार हायमास्टचे उद्घाटन 'केडीएमसी'चे आयुक्त अभिनव गोयल यांच्या हस्ते शनिवारी पार पडले. पालिका क्षेत्रातील प्रत्येक दिवा सोलरवर आणणार असून 'सस्टेनेबल सिटी' या उद्दिष्टाकडे एक मोठे पाऊल टाकले आहे, असे प्रतिपादन गोयल यांनी यावेळी केले.या उपक्रमासाठी पॅनासोनीक इंडियाकडून सीएसआर फंड प्राप्त झाला असून, पालिकेच्या विद्युत विभागाच्या पुढाकारातून हा महत्त्वाचा प्रकल्प प्रत्यक्षात आला आहे. या कार्यक्रमाला शहर अभियंता अनिता परदेशी, अतिरिक्त शहर अभियंता (विद्युत) प्रशांत भागवत, पॅनासोनीक इंडियाचे संदीप जयपाल, राजा मुखर्जी, सचिन ठुबे, कार्यकारी अभियंता जितेंद्र शिंदे, उपअभियंता भागवत पाटील, सहायक आयुक्त हेमा मुंबरकर यांच्यासह अन्य अधिकारी व मान्यवर उपस्थित होते.

तसेच पालिकेच्या सर्व प्रशासकीय आणि शासकीय इमारतींवरही सोलर सिस्टीम बसवण्याची तयारी वेगात आहे. शहरातील नागरिकांनी आणि सोसायट्यांनीही पुढाकार घेऊन त्यांच्या इमारतींवर सोलर पॅनल बसवावे,

**महावितरणच्या विजेची गरज भासणार नाही**

कल्याण येथील गणपती चौकात पहिला हायमास्ट बसविण्यात आला होता आणि डोंबिवली इंदिरा चौकातील हा दुसरा हायमास्ट आहे. नवीन सोलर हायमास्ट १०० टक्के सौरऊर्जेवर चालणारा असून, त्याला महावितरणच्या विजेची गरज भासणार नाही. वीजपुरवठा खंडित झाल्यासही हा हायमास्ट कार्यरत राहील. त्यामुळे शहरातील प्रमुख चौकातील सुरक्षिततेत मोठी वाढ होणार असल्याचे प्रशांत भागवत यांनी सांगितले.

# अवैधरित्या दारू सेवन करणाऱ्या २१ जणांवर कारवाई

## पेण पोलिसांची छापेमारी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण :** पेण तालुक्यातील धावटे परिसरातील स्पाईस हॉटेलमध्ये कोणताही परवाना नसताना अवैधरित्या दारूचे सेवन करणाऱ्या ग्राहकांवर पोलिसांनी धडक कारवाई केली.

पोलीस निरीक्षक संदीप बागुल यांना मिळालेल्या माहितीनुसार, २९ नोव्हेंबर रोजी दुपारी कारवाई करताना हॉटेलमध्ये अवैध दारूच्या गुत्याचा पर्दाफाश केला. या वेळी तेथे २१ जण विविध टेबलांवर बसून दारूचे सेवन करत असल्याचे आढळून आले. रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी संपूर्ण जिल्ह्यात अवैध धंद्यांवर कडक कारवाईचे आदेश दिले असून या मोहिमेमुळे अनेकांचे धाबे दणाणले आहेत. त्यानुसार पेण पोलिसांनी धावटे येथील हॉटेलवर छापेमारी केली. कारवाई दरम्यान दारूच्या बाटल्या, चाकणा, ग्लास, चमचे, टेबल्स असा एकूण ७,१७० किमतीचा माल जप्त करण्यात आला. संबंधित २१ जणांवर गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू झाली असून हॉटेलमध्ये चालणारा अवैध दारूगुत्ता बंद करण्यात आला आहे. पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे. याबाबत अधिकची माहिती पेण पोलीस घेत आहेत. तर पोलिसांच्या या कारवाईमुळे इतरांचे धाबे दणाणले आहेत.

# ह.भ.प. संत सावळाराम महाराज क्रीडा संकुलाच्या प्रत्यक्ष कामाला लवकरच सुरुवात

## खासदार डॉ. श्रीकांत एकनाथ शिंदे यांच्या पाठपुराव्याला यश



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांच्या पुढाकाराने मतदारसंघात मागील दहा वर्षांच्या कालावधीत विविध शहरांमध्ये अनेक क्रीडा सुविधा उभ्या राहिल्या असतानाच आता डोंबिवली येथील ह.भ.प. संत सावळाराम महाराज क्रीडा संकुलाचा विकास दृष्टीपथात आला आहे. या संकुलाच्या प्रत्यक्ष उभारणीच्या कामाला आता लवकरच सुरुवात होत आहे. सुमारे १८० कोटी रुपयांच्या निधीतून क्रीडा संकुलांची उभारणी केली जाणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या सहकार्याने या क्रीडा संकुलाचे काम प्रगतीपथावर जात आहे. या आधुनिक क्रीडासंकुलात पंचवीस हजार चौ.मी. क्षेत्रफळाची बहुमजली क्रीडा इमारत उभारली जाणार आहे. यामध्ये विविध खेळांसाठी अत्याधुनिक सोयी सुविधा उभारण्यात येणार आहेत. या क्रीडा संकुलाच्या उभारणीच्या टप्पा १ मधे इंडोर क्रीडासंकुल आणि ऑलिंपिक दर्जाचा तरणतलाव उभारण्यात येणार आहे. तर टप्पा २ मध्ये स्टेडियम उभारण्यात येणार आहे. यामुळे संपूर्ण जिल्ह्यातील खेळाडूंना विविध खेळांच्या सरावासाठी अत्याधुनिक सुविधांनी आणि साहित्यांनी सुसज्ज असे हक्काचे क्रीडा संकुल उपलब्ध होणार आहे.

कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. श्रीकांत एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून आणि पुढाकाराने खेळाडूंसाठी मतदारसंघातील विविध शहरांमध्ये मोठ्या प्रमाणावर पायाभूत सुविधा उभारण्यात आहेत. खासदार क्रीडा संग्राम ही स्पर्धा अल्पावधीत देशभरात गाजली. तर क्रीडा सुविधांमध्ये अंबरनाथ, उल्हासनगर, कल्याण, डोंबिवली, कळवा, दिवा, मुंब्रा या शहरांमध्ये खेळाडूंसाठी अद्ययावत सुविधा आणि सुसज्ज साहित्य असलेली क्रीडा संकुलांचा समावेश आहे. याच अंतर्गत अंबरनाथ येथे शूटिंग रेंज, क्रीडा संकुल, ऑलिंपिक दर्जाचा तरण तलाव, उल्हासनगर शहरात क्रीडा संकुल, डोंबिवलीत क्रीडा संकुल, कळवा, मुंब्रा आणि दिवा या शहरांमध्ये खेळाडूंसाठी सुविधा उपलब्ध करून देण्यात आले आहे. तर कळवा येथे ऑलिंपिक दर्जाच्या तलावाचे नूतनीकरण आणि क्रीडा संकुलात विविध सुविधांची उभारणी करण्यात येणार आहे.

याच पद्धतीने आता डोंबिवली येथील ह. भ. प. संत सावळाराम महाराज क्रीडा संकुलाचा विकास दृष्टीपथात आला आहे. डोंबिवली शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या या क्रीडा संकुलात संपूर्ण जिल्ह्यातून खेळाडू विविध मैदानी खेळांच्या सरावासाठी येत असतात. याच खेळाडूंना अत्याधुनिक सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे सातत्याने प्रयत्नशील होते. यासाठी शासनाकडे भरीव निधीची मागणी देखील त्यांनी केली होती. त्यांच्या या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली उद्योगमंत्री उदय सामंत यांनी या क्रीडा संकुलाच्या विकासासासाठी भरीव निधी मंजूर केला आहे. या निधीच्या माध्यमातून क्रीडा संकुलात विविध अत्याधुनिक सुविधांची उभारणी करण्यात येणार आहे. तर इंडोअर आणि आऊटडोर स्टेडियम उभारले जाणार आहे. या कामाची लवकरच प्रत्यक्ष उभारणी करण्यात आली आहे.

खासदार डॉ. श्रीकांत एकनाथ शिंदे यांच्या विशेष प्रयत्नांमुळे हा महत्वाचा प्रकल्प साकार होत आहे. संपूर्ण कामकाज महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) यांच्या निधीतून करण्यात येत असून, प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर या संकुलाची देखभाल व व्यवस्थापन कल्याण-डोंबिवली महानगरपालिकाकडे सोपविण्यात येणार आहे. या आधुनिक क्रीडासंकुलात पंचवीस हजार चौ.मी. क्षेत्रफळाची बहुमजली क्रीडा इमारत उभारली जाणार आहे. त्याचसोबत एक हजार दोनशे पन्नास चौ.मी. क्षमतेचा आंतरराष्ट्रीय मानकांचा तरणतलाव, चारशे चौ.मी. डायव्हिंग पूल व प्लॅटफॉर्म, तसेच सोळा हजार चौ.मी. तळघर पार्किंगची सोय निर्माण केली जाणार आहे.

या संकुलात इंडोर क्रीडा संकुलात योगा, जिमनॅशियम, बॅडमिंटन, टेबल टेनिस, कराटे, मार्शल आर्ट, जुडो, स्क्वॅश, स्नूकर, शूटिंग रेंज, जिमनॅस्टिक अशा विविध क्रीडा प्रकारांसाठी अत्याधुनिक सोयी उपलब्ध असतील. त्याचबरोबर आदरातिथ्य व निवास व्यवस्था, भव्य बॅंक्वेट हॉल्स, आधुनिक फिजिओथेरपी केंद्र आणि बहुपयोगी सभागृह देखील या प्रकल्पाचा भाग आहे.

# ख़ोणी गावात मयुरेश्वर व हनुमान मंदिर मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली(शरद शहाणे).** खोणी गावातील ज्येष्ठ समाजसेवक, उद्योजक आणि माजी सरपंच सौ. वंदना शांताराम ठोंबरे यांच्या कुटुंबांनी खोणी गावात मयुरेश्वर आणि हनुमान मंदिर बांधले. या मंदिरातील मूर्तीचा प्राणप्रतिष्ठा सोहळा आणि इतर धार्मिक विधी संपन्न झाला. चार दिवस चालणाऱ्या या सोहळ्यात जीर्णोद्धार, शांती होम, प्रधान संकल्प, देवता स्थापना देवता पूजन, जलाभिषेक, पंचामृत, दुधाभिषेक अभिषेक, हे सर्व शास्त्रोक्त विधी पूर्वक करण्यासाठी कुंभमेळा समिती परमपूज्य महंत श्री सत्यनारायण दास जी, गुरुवर्य यशवंत महाराज, नामदेव महाराज हरड, असे विद्वान साधू महंत यांना आमंत्रित केले होते. शेवटच्या दिवशी भंडाऱ्याचे आयोजन केले होते रॉबिन शांताराम ठोंबरे, शैलेश शांताराम ठोंबरे, यांच्या परम मेहनतीने मयुरेश्वर आणि श्री हनुमान मंदिराचा कार्यक्रम यशस्वी पार पडला.

# दुबईत श्री दत्त जयंती महोत्सव साजरा



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** सातासमुद्रापार दुबईत दरवर्षी प्रमाणे या वर्षी सुध्दा श्री दत्त जयंती महोत्सव २०२५ मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. पूर्णवाद ग्लोबल ह्युमन फाउंडेशन दुबई आणि इंस्पायर इव्हेंटस तसेच दुबईतील विविध सामाजिक संघटना, कंपन्या, सांस्कृतिक मंडळे व मित्रपरिवार यांनी दुबई येथे भव्य दिव्य असा श्री दत्त जयंती महोत्सव साजरा करण्यात आला. पालखी,पाळणा, पादुका पूजन,श्री अभय सावंत यांची मंत्रमुग्ध करणारी भजन संध्या व बालनाट्य-प्ररभू देखीला दास संतुष्ट जाहला - वारसा एक जपणुक , हे या कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण ठरले.

ग्लोबल इंडियन इंटरनॅशनल स्कूल, दुबई येथे शनिवारी सद्गुरु यांच्या पादुकांचा पालखी सोहळा आणि दत्त जन्माचा उत्सव, त्यानंतर भजन व सामूहिक दत्त जाप, आरती, सांस्कृतिक कार्यक्रम अंतर्गत गार्गी सरोदे यांची सुंदर अशी गणेशवंदना भरतनाट्यम द्वारे देण्यात आली. भार्गवी जाधव यांचे भक्तीमय असे गायन तसेच श्रीमंत ढोल ताशा पथक दुबई यांची अप्रतीम अशी मानवंदना वादना द्वारे देण्यात आली. असे अनेक विविध कार्यक्रमाचे आयोजन या वर्षी करण्यात आले.

श्री क्षेत्र पारनेर येथून आलेले पूर्णवादाचर्य- पूर्णवाद भूषण, ॲड.गुणेश पारनेरकर यांच्या निरूपणाने श्री गुरु देव दत्तांच्या तत्वज्ञानाची सुंदर आणि मनाला भिडणारी मांडणी अनुभवायला मिळाली,हे या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य पूर्ण प्रमूख आकर्षण ठरले. कार्यक्रमाचे आयोजनकर्ते पुष्पेंद्र सरोदे, चंद्रशेखर जाधव, सह-सहकारी प्रसाद मांडे, धनंजय सरोदे, महेश प्रधान, संजय पाटील योगेश कराड, राजेंद्र गोळेगावकर, अतुल गायकवाड, संतोष भस्मे, तसेच पूर्णवाद नारी फोरम या सर्वांच्या लाभलेल्या सहकार्यामुळे यंदा भव्य असा यशस्वी श्री दत्त महोत्सव २०२५ सातासमुद्रापार आयोजित केला गेला.

# कल्याण डोंबिवली महानगरपालिका

## उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग

दुरध्वनी क्र. ०२५१-२२०३६२१, विस्तार-२३४

### नोटीस

कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील खालील नमूद अर्जदाराने विकास कामात बाधित होणारी झाडे तोडणे/पुनर्रोपण करणेस परवानगी मागीतली आहे.

| अ. क्र. | अर्जदाराचे नाव | झाडे तोडावयाचे ठिकाण | बाधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण |
|---|---|---|---|---|
| १ | श्रीम. शांताबाई राजाराम म्हात्रे व इतर, कु.मु.प.धा. श्री. युगंधर डी. किरतकर (मे. गिरीधर कन्स्ट्रक्शन) | जुना स.नं. ३४४, नवीन स.नं.९९, हि.नं. ७,८. मौजे शिवाजीनगर, डोंबिवली(प.) | ०२ | नविन इमारतीच्या बांधकामात बाधित होत असल्याने |
| २ | मे. राजेंद्र एंटरप्रायजेस तर्फे श्री. प्रकाशकुमार गणेशमल जैन | सि.स.नं.२८६३ अ, २८६३ ब,मोजे-कल्याण | ०१ | नविन इमारतीच्या पोहोच रस्त्यात बाधित होत असल्याने |
| ३ | मे. भक्ती रिअल्टर्स तर्फे कु.मु.प.धा.श्री. प्रफुल हरिभाई सेंजलीया | मौजे - चिकणघर, स.नं. १२१/१० ब, १२१/११/अ. १२१/१२,१२१/१३, १२१/३/ब, १२२/२. १२३/१/अ, १२३/२, १२३/४.१२१/११/ब. १२१/९,१२१/अ/१/२/२ आणि १२१/३/अ | ०६ | नविन इमारतीच्या बांधकामात व इमारतीच्या पोहोच रस्त्यात बाधित होत असल्याने |

सदरची झाडे तोडण्यास/पुनर्रोपणास परवानगी देणे अगोदर कोणाच्या काही हरकती असल्यास त्या महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ चे कलम ८ (३) अन्वये मागविण्यात येत आहेत. तरी कोणाच्या हरकती असल्यास ७ दिवसाच्या आत उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागात लेखी स्वरुपात योग्य त्या कागदपत्रांसह देण्यात याव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणे/पुनर्रोपण करणेस वरील अधिनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**सही /-**
**(संजय जाधव)**
**वृक्ष अधिकारी**
**वृक्ष प्राधिकरण विभाग,**
**कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण.**

**जा. क्र : कडोंमपा/जसंवि/मुका/७३१**
**दिनांक :- ०१/१२/२०२५**

# डॉ. नानासाहेब धर्माधिकारी उद्यान नागरिकांसाठी खुले करा अन्यथा आंदोलन करू



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील खडेगोळवली येथील महाराष्ट्र भूषण तीर्थरूप डॉ. नानासाहेब धर्माधिकारी उद्यान बंद असून ते नागरिकांसाठी खुले करण्याची मागणी राष्ट्र कल्याण पार्टीने केडीएमसी आयुक्तांकडे केली असून हे उद्यान खुले न केल्यास राष्ट्र कल्याण पार्टी आंदोलन करून स्वतः हे उद्यान नागरिकांसाठी खुले करेल असा इशारा राष्ट्र कल्याण पार्टीचे महासचिव राहुल काटकर यांनी दिला आहे.

मागील अनेक महिन्यांपासून खडेगोळवली येथील महाराष्ट्र भूषण तीर्थरूप डॉ. नानासाहेब धर्माधिकारी उद्यान दुरुस्तीच्या कारणास्तव नागरिकांसाठी बंद ठेवण्यात आलेले आहे. या उद्यानाचा परिसरातील नागरिक मोठ्या प्रमाणात सकाळी व सायंकाळी फिरण्यासाठी, व्यायाम करण्यासाठी तसेच मुलांच्या खेळासाठी नियमितपणे उपयोग करून घेत होते. मात्र उद्यान दीर्घकाळ बंद असल्यामुळे नागरिकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे. सद्यस्थितीत उद्यानातील दुरुस्तीची कामे पूर्ण झाल्यानंतरही ते अद्याप नागरिकांसाठी खुले करण्यात आलेले नाही. म्हणून परिसरातील नागरिकांचा होणारा त्रास व गैरसोय लक्षात घेता, खडेगोळवली येथील महाराष्ट्र भूषण तीर्थरूप डॉ. नानासाहेब धर्माधिकारी उद्यान ८ डिसेंबर पर्यंत नागरिकांसाठी खुले करण्यात यावे. अन्यथा, नागरिकांच्या वतीने राष्ट्र कल्याण पार्टी ९ डिसेंबर रोजी आंदोलन करून हे उद्यान खुले करण्यात येईल असा इशारा केडीएमसी आयुक्तांना देण्यात आला आहे

# भिवंडीत जिवंत काडतूसासह गावठी पिस्तूल बाळगणाऱ्यास अटक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी :** भिवंडीत गुन्हा करण्याचे उद्देशाने स्वतःच्या ताब्यात जिवंत काडतुसा सह एक गावठी पिस्टल बाळगणाऱ्या आरोपीस भिवंडी गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जनार्दन सोनावणे यांच्या विशेष पथकाने मोठ्या शिताफीने ताब्यात घेऊन अटक केली आहे.या प्रकरणी पोलिसठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बाळा आनंद केदारे (वय २२,रा. गायत्रीनगर,नागाव) असे अटक आरोपीचे नाव आहे.सध्या राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुका होत आहेत.त्या दरम्यान गुन्हेगारीस व अग्निशस्त्र बाळगणाऱ्यांवर पोलिसांनी करडी नजर असुन कायदा सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी गस्त व नाकाबंदी मोहीम भिवंडी पोलिस दलाकडून राबविण्यात येत आहे.भिवंडी गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जनार्दन सोनावणे यांच्या निर्देशानुसार पोलीस कर्मचारी शांतीनगर परिसरात शनिवारी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास गस्त घालीत असताना जब्बार कंपाऊंड येथील शहा टेक्सटाईल समोर .बाळा आनंद केदारे हा तरुण संशयास्पद हालचाली करताना आढळून आला.त्यामुळे गुन्हे शाखेच्या पोलिस पथकाने त्यास ताब्यात घेत त्याची अंग झडती घेतली असता त्याच्या जवळ कोणता तरी गुन्हा करण्याच्या उद्देशाने ३० हजार रुपये किमतीचे एक गावठी पिस्टल व एक जिवंत काडतूस बाळगल्याचे आढळून आले. पोलिस पथकाने त्यास ताब्यात घेत शांतीनगर पोलिस ठाण्यात भिवंडी गुन्हे शाखेने दिलेल्या तक्रारी वरून गुन्हा दाखल केला आहे.पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# महिला किक बॉक्सिंग लीग स्पर्धेत जिल्ह्यातील 300 हून अधिक विद्यार्थिनींनी गाजवले मैदान

दै. ठाणे जीवनदीप वार्ता



**कल्याण :** भाजपाचे महाराष्ट्र प्रदेशअध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली क्रीडा व युवक कल्याण मंत्रालयाच्या (भारत सरकार) आणि भारतीय खेल प्राधिकरण यांच्या संयुक्त विद्यमाने, डोंबिवलीतील सेंट होली एंजल शाळेत महिलांच्या खेळाला नवी दिशा देणारी एक अविस्मरणीय स्पर्धा पार पडली. खेलो इंडिया 'अस्मिता' अंतर्गत आयोजित केलेली ही ८४ वी महिला किक बॉक्सिंग लीग महिला शक्तीचा जोश आणि दमदार सहभाग दाखवणारी ठरली.

या एका दिवसाच्या महास्पर्धेत ठाणे जिल्ह्यातील तब्बल ३०० हून अधिक उत्साही विद्यार्थिनी स्पर्धकांनी भाग घेतला. प्रत्येक किकने आणि प्रत्येक मुष्टियुद्धाने 'मी कोणापेक्षा कमी नाही' हा आत्मविश्वास दाखवून दिला. लीगचे उद्घाटन आंतरराष्ट्रीय सायकलपटू विनोद पूनमिया यांच्या हस्ते झाले. यावेळी किक बॉक्सिंग स्पोर्ट्स असोसिएशनचे महाराष्ट्र अध्यक्ष निलेश शेलार, किक बॉक्सिंग स्पोर्ट्स वेल्फेअर फाउंडेशनचे ठाणे जिल्हा अध्यक्ष शुभम मिश्रा, कासा बेला गोल्ड फेडरेशनचे अध्यक्ष योगेश पाटील, पलावा भाजप युवा मोर्चाचे अध्यक्ष विवेक चौधरी आणि होली एंजल शाळेचे मुख्याध्यापक बिजॉय उम्मेन आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या वेळी, किक बॉक्सिंग स्पोर्ट्स वेल्फेअर फाउंडेशनचे ठाणे जिल्हा अध्यक्ष शुभम मिश्रा हे महिला खेळाडूंना प्रेरणा देत म्हणाले की "आज या किक बॉक्सिंग रिंगमध्ये जेवढ्या मुली उतरल्या आहेत, त्या फक्त स्पर्धक नाहीत, तर त्या भारताच्या उज्ज्वल भविष्याच्या आधारस्तंभ आहेत. प्रत्येक मुलीने 'अस्मिता'च्या माध्यमातून स्वतःच्या क्षमता ओळखल्या पाहिजेत. खेळाने मिळवलेला आत्मविश्वास त्यांना आयुष्याच्या प्रत्येक लढ्यात विजयी करेल. खेलो इंडियाचा हा मंच महिलांना जागतिक स्तरावर चमकण्याची संधी देईल.




Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024